16 MAY 2026
पुण्यनगरी



वृषभ मोरे



आकाश पाटील



सौरभ म्हैसकर

# 'एजीपीएम'च्या विद्यार्थ्यांची 'हिंदुस्थान केमिकल्स'मध्ये निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कृषी रसायने व कीड व्यवस्थापन अधिविभाग आणि केंद्रीय रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतींमधून विभागाच्या वतीने 'एजीपीएम'च्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे.

हिंदुस्थान गम अँड केमिकल्स लि. या बिर्ला कार्पोरेशन व सेन्स्को, युरोप यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या कंपनीने गेल्या दि. ३० एप्रिल रोजी अधिविभागात कॅम्पस मुलाखती घेतल्या. यामध्ये एम. एस्सी.च्या अंतिम वर्षातील अनेक विद्यार्थी सहभागी झाले. त्यामधून वृषभ मोरे, आकाश पाटील आणि सौरभ म्हैसकर या तीन विद्यार्थ्यांची कंपनीने निवड केली असून, त्यांना सुरुवातीला रुपये ३ लाख प्रतिवर्ष इतके पॅकेज मिळाले आहे. कंपनीचे स्टेट हेड सचिन सैदाने आणि सरव्यवस्थापक (विक्री) ए. एच. मुलाणी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

1 6 MAY 2026

सिंधुदुर्ग समाचार

# 'ए.जी.पी.एम.'च्या तीन विद्यार्थ्यांची 'हिंदुस्थान केमिकल्स'मध्ये निवड

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा कृषी रसायने व किड व्यवस्थापन अधिविभाग (Agrochemicals and Pest Management) आणि केंद्रीय रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षी घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतींमधून विभागाच्या तीन विदयार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे.

हिंदुस्थान गम अँड केमिकल्स लि. या बिर्ला कॉर्पोरेशन व सेंन्स्को, युरोप यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या कंपनीने गेल्या ३० एप्रिल रोजी अधिविभागात कॅम्पस मुलाखती घेतल्या. यामध्ये एम.एस्सी.च्या अंतिम वर्षातील अनेक विदयार्थी सहभागी झाले. त्यामधून वृषभ मोरे, आकाश पाटील आणि सौरभ म्हैसकर या तीन विदयार्थ्यांची कंपनीने निवड केली असून त्यांना सुरवातीला रुपये ३ लाख / प्रतिवर्ष इतके पॅकेज मिळाले आहे. कंपनीचे स्टेट हेड सचिन सैदाने आणि सरव्यवस्थापक (विक्री) ए. एच. मुलाणी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

या निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अधिविभागाचे प्रमुख डॉ. सुनील गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कृषि रसायने व किड व्यवस्थापन अधिविभागामध्ये अनेक नामवंत कंपन्या नियमितपणे कॅम्पस मुलाखती घेत असतात. त्यामुळे आज अधिविभागातील विदयार्थी अनेक नामवंत कंपन्यांमध्ये जागतिक स्तरावर, मोठ्या हुद्द्यावर देशविदेशांत काम करत आहेत. काही विदयार्थ्यांनी आपले व्यवसाय देखील उभे केले आहेत. या अधिविभागातील विदयार्थ्यांना नोकरी आणि स्वतःचा व्यवसाय ग्रामध्ये अनेक चांगल्या संधी आहेत. या संधींची माहिती व लाभ विदयार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिविभाग सतत प्रयत्नशील आहे.

महा न्यूज & व्ह्यूज

16 MAY 2020

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# 'ए.जी.पी.एम.'च्या तीन विद्यार्थ्यांची 'हिंदुस्थान केमिकल्स'मध्ये निवड

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाचा कृषी रसायने व किड व्यवस्थापन अधिविभाग (Agrochemicals and Pest Management) आणि केंद्रीय रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षी घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतींमधून विभागाच्या तीन विदयार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे.



हिंदुस्थान गम अँड केमिकल्स लि. या बिर्ला कॉर्पोरेशन व सेंन्स्को, युरोप यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या कंपनीने गेल्या ३० एप्रिल रोजी अधिविभागात कॅम्पस मुलाखती घेतल्या. यामध्ये एम.एस्सी.च्या अंतिम वर्षातील अनेक विदयार्थी सहभागी झाले. त्यामधून वृषभ मोरे, आकाश पाटील आणि सौरभ म्हैसकर या तीन विदयार्थ्यांची कंपनीने निवड केली असून त्यांना सुरवातीला रुपये ३ लाख / प्रतिवर्ष इतके पॅकेज मिळाले आहे. कंपनीचे स्टेट हेड सचिन सैदाने आणि सरव्यवस्थापक (विक्री) ए. एच. मुलाणी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

या निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अधिविभागाचे प्रमुख डॉ. सुनील गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कृषि रसायने व किड व्यवस्थापन अधिविभागामध्ये अनेक नामवंत कंपन्या नियमितपणे कॅम्पस मुलाखती घेत असतात. त्यामुळे आज अधिविभागातील विदयार्थी अनेक नामवंत कंपन्यांमध्ये जागतिक स्तरावर, मोठ्या हुद्यावर देशविदेशांत काम करत आहेत. काही विदयार्थ्यांनी आपले व्यवसाय देखील उभे केले आहेत. या अधिविभागातील विदयार्थ्यांना नोकरी आणि स्वतः चा व्यवसाय यामध्ये अनेक चांगल्या संधी आहेत. या संधींची माहिती व लाभ विदयार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिविभाग सतत प्रयत्नशील आहे.

16 MAY 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो सायन्सच्या 160 हून अधिक विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कंपन्यांत प्लेसमेंट : डॉ. किरणकुमार शर्मा




**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या गेल्या दहा बॅचमधील १६० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींची आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कंपन्या, विद्यापीठांमध्ये प्लेसमेंट्स झालेली आहेत, अशी माहिती संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

विद्यापीठात स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या दहाव्या बॅचचा निरोप समारंभ नुकताच झाला. त्यावेळी ते बोलत होते.

विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्लेसमेंट यशामुळे अधिविभागाने सातत्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली असल्याचे सांगून डॉ. शर्मा म्हणाले, अधिविभागातील विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठांसह नामांकित उद्योगसंस्थांमध्ये ६५ लाखांपर्यंतचे वार्षिक पॅकेज मिळविण्यापर्यंत मजल मारली आहे. 'बीएससी-एमएससी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी' या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आजपर्यंत सर्वाधिक आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्स झालेल्या आहेत. १६० पेक्षा अधिक विद्यार्थी अमेरिका, कॅनडा, युके, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, इटली, इस्त्राइल, फिनलँड, फ्रान्स, झेक रिपब्लिक, पोलंड, स्वित्झर्लंड, दक्षिण कोरिया, जपान, चीन, सौदी अरेबिया, तैवान तसेच स्वीडन इत्यादी देशांमध्ये कार्यरत आहेत. सहा विद्यार्थी केंद्र सरकारमध्ये तर आठ विद्यार्थी राज्य शासनात विविध पदांवर नियुक्त झाले आहेत. विविध प्रकारच्या नॅनोफॉर्म्युलेशन्स, कोटिंग्ज, फॅब्रिक्स, पेंटिंग, फार्मास्युटीकल्स्, नॅनोमटेरियल्स निर्मिती, पुरवठा तमेच सर्विसेस इत्यादीसाठीच्या विविध राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये तसेच विविध राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संकुलात करिअर प्रोग्रेशनसाठी येथील शंभरपेक्षा अधिक विद्यार्थी नियुक्त झाले आहेत.

प्रतिवर्षी ६५ लाख रुपये पॅकेज मिळविणाऱ्यांमध्ये डॉ. रोहन पाष्टे (मायक्रॉन टेक्नॉलॉजी, तैवान), डॉ. हर्षदा पाटील (मायक्रॉन टेक्नॉलॉजी, सिंगापूर), डॉ. अतुल खोत (सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स, दक्षिण कोरिया), डॉ. किरण निर्मल (सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स, दक्षिण कोरिया), डॉ. शुभम पाटील (नेक्स्टईन सेमीकंडक्टर, दक्षिण कोरिया) यांचा समावेश आहे. विभागातील आठ विद्यार्थ्यांनी भारतात स्वतःच्या स्टार्टअप कंपन्या स्थापित केल्या असून त्या उत्तमरीत्या कार्यरत आहेत. या यशस्वी प्लेसमेंटमुळे अधिविभागाची शैक्षणिक गुणवत्ता आणि संशोधनक्षमता अधोरेखित झाली असून, विद्यार्थ्यांसाठी जागतिक पातळीवरील संधींचे दरवाजे खुले झाले आहेत. या प्लेसमेंट्समध्ये वर्षागणिक वाढ होत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

बारावी सायन्सनंतर बी.एस्सी.-एम.एस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी) या पाच वर्षांच्या एकत्रित अभ्यासक्रमासाठी तसेच बी.एस्सी. सायन्सनंतर एम.एस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी) या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरु झालेला आहे. याच अभ्यासक्रमांच्या माध्यमातून कोल्हापुरासह महाराष्ट्रातल्या तसेच इतर राज्यातल्याही खेडोपाड्यांतील मुलांना आपले उज्ज्वल भवितव्य घडविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या संधीचा इच्छुक विद्यार्थ्यांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शर्मा यांनी केले.

यावेळी सन २०२१-२२ मध्ये बी.एस्सी.-एम.एस्सी. (नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी) या पाच वर्षांच्या एकत्रित अभ्यासक्रमाच्या तसेच सन २०२४-२५ मध्ये एम.एस्सी. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. निरोप समारंभात शैक्षणिक वर्षात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. प्रमोद जे. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. व्ही. खोत यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. के. के. पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. प्रमोद कसबे, डॉ. एस. एस. निर्मळे, डॉ. एस.ए. सावंत, डॉ. वाय.वाय. पाटील यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

1 6 MAY 2026

पुण्यनगरी

# नॅनो सायन्सचे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय कंपन्यांत : डॉ. शर्मा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या गेल्या दहा बॅचमधील १६० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींची आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कंपन्या, विद्यापीठांमध्ये प्लेसमेंट झालेली आहेत, अशी माहिती संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

विद्यापीठात स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या दहाव्या बॅचचा निरोप समारंभप्रसंगी ते बोलत होते. डॉ. शर्मा म्हणाले, अधिविभागातील विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठांसह नामांकित उद्योग संस्थांमध्ये ६५ लाखांपर्यंतचे वार्षिक पॅकेज मिळवण्यापर्यंत मजल मारली आहे.

प्रतिवर्षी ६५ लाख रुपये पॅकेज मिळवणाऱ्यांमध्ये डॉ. रोहन पाष्टे (मायक्रॉन टेक्नॉलॉजी, तैवान), डॉ. हर्षदा पाटील (मायक्रॉन टेक्नॉलॉजी, सिंगापूर), डॉ. अतुल खोत (सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स, दक्षिण कोरिया), डॉ. किरण निर्मल (सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स, दक्षिण कोरिया), डॉ. शुभम पाटील (नेक्स्टईन सेमीकंडक्टर, दक्षिण कोरिया) यांचा समावेश आहे.

16 MAY 2026
सकाळ

# 'नॅनो सायन्स'च्या १६० विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : 'शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या गेल्या दहा बॅचमधील १६० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींची आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कंपन्या, विद्यापीठांमध्ये प्लेसमेंट्स झाली आहेत', अशी माहिती संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली. विद्यापीठात स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या दहाव्या बॅचचा निरोप समारंभात ते बोलत होते. ते म्हणाले, 'अधिविभागातील विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठांसह नामांकित उद्योगसंस्थांमध्ये ६५ लाखांपर्यंतचे वार्षिक पॅकेज मिळविण्यापर्यंत मजल मारली आहे. 'बीएस्सी-एमएस्सी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी' या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आजपर्यंत सर्वाधिक आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट्स झाल्या आहेत. सहा विद्यार्थी केंद्र सरकारमध्ये तर आठ विद्यार्थी राज्य शासनात विविध पदांवर नियुक्त झाले आहेत. विभागातील आठ विद्यार्थ्यांनी भारतात स्वतःच्या स्टार्टअप कंपन्या सुरू केल्या आहेत.' डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. व्ही. खोत यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. के. के. पवार यांनी आभार मानले.

16 MAY 2026 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'मीडिया आणि कम्युनिकेशन अंतर्गत व्याख्यान

| प्रतिनिधी, कोल्हापूर

भारतीय समाजात रेडिओला विशेष महत्त्व आहे. अनेक स्थित्यंतरे आली तरी रेडिओची गरज कमी झालेली नाही. उलट समुदायाच्या विकासात रेडिओ उत्तरोत्तर भरीव योगदान देत आहे, असे प्रतिपादन ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात मीडिया आणि कम्युनिकेशन क्लब अंतर्गत व्याख्यानात ते बोलत होते. 'कम्युनिटी रेडिओ समजून घेताना" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव होते.



**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना डॉ. सचिनकुमार पाटील सोबत डॉ. शिवाजी जाधव, डॉ. युवराज जाधव, जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे.**

डॉ. पाटील म्हणाले, माहितीचा प्रसार करण्यात माध्यमांची भूमिका महत्त्वाची असते. रेडिओसारख्या माध्यमाने विश्वासार्हतेच्या जोरावर समाजमनावर अधिराज्य गाजवले आहे. सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे माध्यम म्हणून रेडिओ नेहमीच केंद्रस्थानी राहिला आहे.

जयप्रकाश पाटील यांनी कम्युनिटी रेडिओचा इतिहास विशद केला. अभिषेक पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या शिववाणी कम्युनिटी रेडिओबद्दल माहिती दिली. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी अभार मानले. यावेळी ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील डॉ. युवराज जाधव, अनुप जत्राटकर आदींसह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.